सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६१ | मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# स्मृती मानधनाला एकाच दिवशी बसले दोन धक्के...!

## वडिलांना हृदयविकाराचा झटका, होणाऱ्या पतीचीही बिघडली प्रकृती...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रिकेटर स्मृती मानधना आणि संगीतकार पलाश मुच्छल यांच्या लग्नातील संगीतमधील नृत्याचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. देशाच्या लेकीचे लग्न असल्याने सर्वांनाच या लग्नाची उत्सुकता होती. लग्नाच्या व्हिडिओमध्ये दोघांच्याही चेहऱ्यावर आनंद दिसत होता. स्मृती मानधनाच्या सांगतीलीत घरात लग्नाची तयारी सुरू होती. मात्र, लग्नाच्या काही तासांपूर्वी स्मृती मानधनाचे वडील श्रीनिवास मानधना यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर तिचा होणारा पती पलाश मुच्छल याचीही प्रकृती बिघडली आहे. वडिलांची प्रकृती स्थिर होईपर्यंत अनिश्चित काळापर्यंत हे लग्न पुढे ढकलण्यात आले आहे.

वडिलांची प्रकृती स्थिर होत नाही, तोपर्यंत लग्न करणार नसल्याचे स्मृतीने ठरवले. दरम्यान, वडिलांची प्रकृती बिघडल्याचे दुःख असताना स्मृती मानधनाला आणखी दुसरा धक्का बसला आहे. स्मृती मानधनाचा होणारा पती पलाश मुच्छल याचीही तब्येत बिघडल्याची माहिती समोर आली आहे. त्याला ॲसिडिटीचा त्रास जाणवत होता. त्यामुळे त्याला अस्वस्थ वाटत होते. म्हणून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात उपचार घेऊन तो निघून गेल्याची माहिती समोर आली आहे.

**स्मृतीच्या मॅनेजरने दिली माहिती**

स्मृती मानधनाच्या मॅनेजरने मीडियाला माहिती देताना सांगितले, की सकाळी नाश्त्या दरम्यान स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांची तब्येत अचानक बिघडली. थोड्या वेळ वाट पाहिल्यानंतरही त्यांना अस्वस्थ वाटत असल्याने तातडीने रुग्णवाहिका बोलावण्यात आली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## स्मृती मानधनाच्या कुटुंबात आणखी कोण- कोण आहे ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीम इंडियाची स्टार फलंदाज स्मृती मानधनाच्या (सांगलीकर) कुटुंबात कोण कोण आहेत आणि सर्व जण काय करतात? याबाबत अनेकांना माहिती नसेल. चला तर मग जाणून घेऊयात त्यांच्या परिवाराबद्दल... स्मृती मानधना व पलाश मुच्छल यांचा रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी विवाहसोहळा होणार होता. मात्र, तिच्या वडिलांची तब्येत बिघडल्याने तिचे लग्न रद्द करण्यात आले आहे. स्मृती मानधनाच्या वडिलांचे नाव श्रीनिवास मानधना आहे. ते स्वतः एक क्रिकेटपटू होते. त्यांनी सांगलीसाठी क्रिकेट खेळले आहे. ते व्यवसायाने केमिकल डिस्ट्रिब्युटर आहेत. ते सांगलीत 'एसएम१८ कॅफे' चालवतात. स्मृती मानधनाच्या आईचे नाव स्मिता मानधना आहे. त्या गृहिणी आहेत. स्मृतीच्या क्रिकेट कारकिर्दीत तिच्या आई-वडिलांनी तिला संपूर्ण पाठिंबा दिला आहे. स्मृती मानधनाला मोठा भाऊ आहे. त्याचे नाव श्रवण मानधना आहे. श्रवण मानधनाने देखील महाराष्ट्रसाठी अंडर-१९ क्रिकेट खेळले आहे. आता तो बँकर असून 'एसएम १८ कॅफे' व टर्फची जबाबदारीही सांभाळतो. स्मृतीने तिच्या भावाला क्रिकेट खेळताना पाहिले आणि त्यानंतर तिने क्रिकेट खेळण्यास सुरूवात केली. ती ४ वर्षांची असल्यापासून तिच्या वडिलांबरोबर भावाचा सराव पाहायला जात होती.





स्मृतीचा भाऊ श्रवणचे लग्न झाले आहे. मात्र, त्याच्या पत्नीचे नाव कधी समोर आलेले नाही. श्रवणने १० जुलै २०१८ ला लग्न केले आहे. श्रवणला एक मुलगा आहे, त्याचे नाव ह्निनय मानधना आहे. त्याचा जन्म ९ ऑक्टोबर २०२१ रोजी झाला. स्मृतीच्या लग्नापूर्वीच्या विधींमध्ये तो अनेकदा बागडताना दिसला आहे. मानधना कुटुंबामध्ये पलाश मुच्छल हा नवा सहावा व्यक्ती आता येणार आहे. स्मृती पलाश यांचे लग्न रद्द झाल्यानंतर आता पुन्हा लग्न कधी होणार याची तारीख अजून समोर आलेली नाही.

## निवेदन

चंपाषष्ठी हा मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील सहाव्या दिवशी साजरा होणारा खंडोबारायांचा उत्सव. यंदा तो बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जेजुरीसह सर्वत्र साजरा होईल. या पार्श्वभूमीवर आम्ही आजच्या अंकातील 'मंगल पाना'त चंपाषष्ठीचा विविधांगी मजकूर प्रसिद्ध करीत आहोत. याची वाचक, विक्रेते, हितचिंतक, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

\- संपादक



॥मंगल॥ पान

श्री खंडेरायांचा षड्रात्रोत्सव प्रारंभ म्हणजेच देव दीपावली

कथा खंडेरायांची...

खंडोबा महात्म्य

खंडोबांच्या गाण्याचा

# मोठ्या लग्नतिथीमुळे मतदानाची टक्केवारी घटण्याची चिन्हे!

## उमेदवारांसह मतदारांची होणार दमछाक; निवडणूक शाखेकडून जनजागृती मोहीम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीची रणधुमाळी तापली आहे. मंगळवार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मात्र, याच दिवशी मोठी लग्नतिथीही असल्याने उमेदवारांसह मतदारांची चांगलीच दमछाक होणार आहे. विशेषतः मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी उमेदवारांना कसरत करावी लागणार आहे. मतदानाची टक्केवारीही घटण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे निवडणूक शाखेने लोकशाही बळकट करण्यासाठी आधी मतदान करुन मग लग्नास जावे, असे आवाहन मतदारांना केले आहे.

**उमेदवारांकडून वाहनांची सोय!**

लग्न घरातील मंडळींना आणि वऱ्हाडींना मतदानासाठी जाता यावे, यासाठी अनेक उमेदवारांनी योजना आखल्या आहेत. मतदानाच्या दिवशी सकाळी लवकर मतदान करून घेता यावे यासाठी लग्नाला जाणाऱ्या वऱ्हाडींसाठी वाहनांचे नियोजन करुन ठेवण्यात आले आहे. मतदान होण्यासाठी निवडणूक शाखेनेही व्यापक जनजागृतीवर भर दिला आहे.

**सामाजिक संस्था, आयोजकांची मदत हवी**

प्रशासनाने विवाह आयोजन समित्या, फोटोग्राफर्स, हॉल व्यावसायिक आणि सामाजिक संस्थांना विशेष आवाहन केले आहे. लग्नाच्या आमंत्रण पत्रिकांवर 'आधी मतदान करा' हा संदेश द्यावा. तसेच समारंभात घोषणा करून मतदारांना प्रोत्साहित करावे, अशी अपेक्षा प्रशासनाने केली आहे.



### मतदानाचे कर्तव्य बजवावे!

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदारांना मतदान करण्याविषयी भावनिक आवाहन केले आहे. २ डिसेंबर रोजी मतदान आणि अनेक ठिकाणी लग्न कार्य आहे. मात्र, केवळ ५ ते १० मिनिटांचा वेळ काढून मतदान केंद्रावर जाऊन आपण आपल्या लोकशाहीला बळकट करू शकतो. मतदारांनी लग्नाचे नियोजन करताना सकाळी लवकर मतदानाला प्राधान्य द्यावे. मतदानाचा हक्क बजाविण्याची गरज आहे. त्यानंतर लग्न कार्यास जावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी अनेक शहरवासीय परवावी जाणार आहेत. तसेच पाहुण्यांची ये-जा, वरातीची धांदल, भोजन व्यवस्था या कारणांनी मतदानाला वेळ मिळणे कठीण ठरणार आहे.

## सेवानिवृत्तीचे वय आता ६० वर्षे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही दिवसांपासून राज्य शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याची मागणी होत होती. सध्या सेवानिवृत्तीचे वय ५० वर्षे आहे. दुसरीकडे केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र राज्यात कार्यरत असणाऱ्या 'ड' संवर्गातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय देखील ६० वर्षे करण्याचा निर्णय घेतला आहे.

# पालिका निवडणुकीत विकासाचा अजेंडा हरवला





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

अमळनेर : पालिका निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवार जोरदार प्रचारात लागले आहे. प्रचाराला वेळ कमी असल्याने प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांना कसरत करावी लागत आहे. शहरातील गल्ली बोळात उमेदवारांच्या भेटीगाठी, रॅली आणि सोशल मीडियावरील प्रचार उदंड झाला आहे. मात्र, मोठ- मोठी आश्वासने, भावनिक नारे आणि पक्षीय समीकरणे पुढे येत आहेत. मात्र, शहराच्या सर्वांगीण विकासाचा अजेंडा कुठेतरी हरवलेला दिसत आहे.

निवडणूक लागली की उमेदवारांना सगे- सोयरे व मित्रांची आठवण होते. मात्र, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, आरोग्य आणि शिक्षण या नागरिकांच्या मुख्य गरजांवर बोलण्यास अनेक उमेदवार टाळाटाळ करताना दिसत आहेत.

प्रचारात धावपळ, उमेदवारांची घराघरातील धडक भेटी आणि कार्यकर्त्यांची धावपळ यामुळे शहराचे वातावरण ऐन थंडीत चांगलेच तापले आहे. विकासाच्या नावाने मते मागताय, पण विकासाचाच मुद्दा आहे तरी कुठे? असा प्रश्न नागरिक उपस्थित करताना दिसून येत आहेत. प्रचारासाठी कमी वेळ, वाढलेली स्पर्धा आणि बहुरंगी लढती यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.

# मेंदी व्यवसायातुन उजळले नशीब!

## मानसी करतेय अवघ्या २३व्या वर्षी लाखोंची कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुलींना लहानपणापासूनच कलेची देणगी असते. मात्र, या कलेचे कुठेही प्रदर्शन होत नाही. मात्र, 'बीएएफ'मध्ये शिक्षण घेणाऱ्या मानसी या विद्यार्थिनीने शाळा ते महाविद्यालयापर्यंत तिच्या विविध कलेतून खूप बक्षीस मिळविले आहेत. आता मेंदी व्यवसायातून ती अवघ्या २३व्या वर्षी लाखोंची कमाई करते आहे. या व्यवसायातून तीचे नशीब उजळले आहे.



ज्वेलरी, मेंदी, स्टोरी टेलिंग असे नाविन्यपूर्ण प्रकारांचा सध्या ट्रेंड आहे. त्यातच मेंदी व्यवसायाची रंगत आणि उलाढाल खूप वाढली आहे. भारतीय, फ्लोरल, दुबई, अरेबिक, गल्फ या मेंदीच्या प्रचलित स्टाईल बरोबरच नवे ट्रेंडही बाजारात येत आहेत. मेंदी आता पूर्वेकडीलच नाही, तर पाश्चिमात्य देशातही लोकप्रिय होऊ लागली आहे. त्यामुळेच मेंदी ही कला आता करियर म्हणूनही नावारूपाला येत आहे. या कलेच्या माध्यमातून अवघ्या २३व्या वर्षी मानसीने कुठलाही कोर्स केलेला नसताना स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील रहिवासी असलेल्या मानसीला प्रोत्साहन देणारे कोणीही नव्हते. त्यामुळे तिने तिच्या मैत्रिणीकडे एक प्रोफेशनल मेंदी आर्टिस्ट जॉइन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ती प्रोफेशनल मेंदी आर्टिस्ट झाली. मानसीने २०२३मध्ये मेंदीचे क्लासेस घेण्याचे ठरवले. सुरूवातीला ८ मुलींपासून तीने क्लास सुरू केला. दोनच वर्षात तिच्या टिटवाळा, गोवेली आणि कल्याण या ठिकाणी तीन बॅच सुरू झाल्या आहेत. त्यातच ती स्वतः मेंदी कोन बनविण्यापासून सर्वच स्वतः हाताळते. अत्यंत कमी वयात तीने गाठलेले यशोशिखर प्रेरणादायी आहे.

## निधन वार्ता

### श्रीकांत पाटील



अमळनेर- तालुक्यातील मंगरूळ येथील ग्रामविकास शिक्षण मंडळाचे सचिव श्रीकांत अनिल पाटील (वय ३७) यांचे सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, बहीण असा परिवार आहे.

## दिनविशेष

२५ नोव्हेंबर

- छत्रपती शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याची पायाभरणी केली.
- फ्रेडरिक बँटिंग यांनी मधुमेहासाठी इन्सुलिनचा शोध जाहीर केला.
- नेशनल कॅडेट कोर्सची स्थापना.
- कमल नारायण सिंह यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन, कलकत्ता तर्फे राज क्रिस्टो दत्त स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...! जय स्वदेशी...!!

# 'हॅलो' शब्द फोनवर सर्वात आधी कोणी वापरला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक जण फोनवर बोलताना सर्वात अगोदर हॅलो असे म्हणतो. मात्र, या शब्दाचा उगम कसा झाला, हे अनेकांना माहित नाही. या शब्दाच्या जन्माची कथा रोचक आहे. जगभरात आता 'हॅलो' हा शब्द परवलीचा झाला आहे. मात्र, सर्वात अगोदर 'हॅलो' कोण म्हणाले होते हे जाणून घेऊयात.

'वर्ल्ड हॅलो डे' २१ नोव्हेंबर १९७३ पासून साजरा केला जातो. त्या काळात इजिप्त





आणि इस्रायल यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. अशा तणावपूर्ण स्थितीत शांततेचा संदेश देण्यासाठी एरिझोना स्टेट विद्यापीठाचे पीएचडीचे विद्यार्थी ब्रायन मॅककॉर्मके आणि हार्वर्ड युनिव्हर्सिटीमधील विद्यार्थी मायकेल मॅककॉर्मके हे समोर आले. त्यांनी शांततेसह सुसंवादाचा संदेश दिला. त्यासाठी त्यांनी एकूण सात भाषांमध्ये १३६० शब्द असलेला एक संदेश दिला. भांडण हे चर्चा करून सोडविता येऊ शकते, असे यात म्हटले होते. तेव्हापासून 'हॅलो' हा शब्द शांततेची पहिली अभिव्यक्ती म्हणून समोर आला. त्यानंतर जागतिक 'हॅलो डे'ची सुरुवात झाली. हा दिवस १८० पेक्षा जास्त देशांमध्ये साजरा केला जातो. दुसरीकडे टेलिफोनची निर्मिती करणाऱ्या अलेक्झांडर ग्रॅहन यांनी टेलिफोनवरून पहिला कॉल आपली प्रेमिका मार्गारेट 'हॅलो' हिला केला होता. फोन करून त्यांनी सर्वात अगोदर हॅलो हा शब्द उच्चारला होता, असे म्हटले जाते. मात्र, या कथेवर अनेक जण आक्षेप घेतात. हॅलो हा शब्द जर्मन 'हला' या शब्दापासून आलेला आहे, असेही काहींचे मत आहे. त्यानंतर आता जगभरात फोनवरून संवादाची सुरुवात हॅलो या शब्दानेच होते. हॅलो हा शब्द उच्चारूनच आता संवाद केला जातो.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# मसाला पान



# देशसेवेचे स्वप्न मनात ठेवून जर्मनीतील कोट्यवधींची नोकरी सोडली!

## आयएएस गरिमा अग्रवाल यांचा प्रेरणादायी प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयएएस गरिमा अग्रवाल यांनी जर्मनीतील नोकरी सोडून देशाची सेवा करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आयआयटी हैदराबादमधून बी.टेक. केले. त्यानंतर जर्मनीतील एका प्रतिष्ठित कंपनीत नोकरी मिळविली. मात्र, देशसेवेची तीव्र इच्छा त्यांना भारतात परत घेऊन आली. त्यांनी यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन आयएएस अधिकारी बनण्याचा मार्ग निवडला.

गरिमा अग्रवाल यांचा जन्म मध्य प्रदेशात झाला. लहानपणापासूनच त्या अभ्यासात हुशार होत्या. त्यांनी आयआयटी जेईई परीक्षा उत्तीर्ण होऊन आयआयटी हैदराबादमध्ये इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश घेतला. तिथेही त्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना जर्मनीतील एका मोठ्या कंपनीत नोकरीची ऑफर मिळाली. काही काळ तिथे काम केल्यानंतर त्यांच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला, “मी माझ्या देशासाठी काहीतरी मोठे करू शकते का?” या विचाराने त्यांच्या आयुष्याची दिशा बदलली.

**आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण –**

गरिमा यांनी २०१७ मध्ये पहिल्यांदा यूपीएससी परीक्षा दिली. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी २४० वी रँक मिळवून आयपीएस अधिकारी बनल्या. प्रशिक्षणानंतरही त्यांची महत्त्वाकांक्षा कायम होती. त्यांनी नोकरी करत असतानाच पुन्हा अभ्यास केला. २०१८ मध्ये यूपीएससी परीक्षेत त्यांनी ४० वी रँक मिळवून आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांची ही यशोगाथा इच्छाशक्ती मजबूत असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही हे दाखवून देते.



सक्सेस स्टोरी

**समर्पणाचे उत्तम उदाहरण**

गरिमा अग्रवाल यांनी आयआयटी आणि यूपीएससी या दोन्ही कठीण परीक्षा उत्तीर्ण करून ‘ डबल अचीवर ’ म्हणून ओळख मिळवली. त्यांनी जर्मनीसारखी विकसित जागा सोडून भारतात समाजसेवा करण्याचा मार्ग निवडला. त्या देशातील अशा महिला अधिकाऱ्यांपैकी एक आहेत ज्यांनी तरुणांसाठी शिक्षण आणि समर्पणाचे उत्तम उदाहरण ठेवले आहे. त्यांची ही वाटचाल हेच दर्शवते की यश केवळ परदेशात नाही, तर आपल्यातील आंतरिक जिद्दीत दडलेले असते.

**जेव्हा एक महिला ठरवते, तेव्हा इतिहास घडतो**

त्यांच्या या निर्णयाने अनेक मुलींना मोठे स्वप्न पाहण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यांनी हे सिद्ध केले आहे की कोणताही क्षेत्र महिलांसाठी कठीण नाही, जर त्या दृढनिश्चय आणि आत्मविश्वासाने पुढे सरसावल्या. गरिमा अग्रवाल यांची कहाणी हेच सांगते की, आपल्या देशासाठी काहीतरी करण्याची भावना किती महत्त्वाची आहे. परदेशातील आरामदायी जीवन सोडून देशाची सेवा करणे हे सोपे काम नाही. त्यांनी आयपीएस बनल्यानंतरही आपले ध्येय सोडले नाही. त्यांनी पुन्हा एकदा यूपीएससीची तयारी केली आणि आयएएस अधिकारी बनल्या. हे त्यांच्या चिकाटीचे आणि मेहनतीचे फळ होते. त्यांच्या या प्रवासातून हे शिकायला मिळते, की जर मनात जिद्द असेल तर कोणतीही अडचण मोठी वाटत नाही. गरिमा अग्रवाल यांनी दाखवून दिले, की शिक्षण आणि समर्पण यांच्या जोरावर कोणतीही व्यक्ती आपले ध्येय गाठू शकते.

# रात्री मळलेले पीठ पुन्हा वापरणे किती योग्य?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतात बहुतेक घरांमध्ये चपाती रोज खाल्ली जाते. चपाती बनविताना अनेकदा टेन्शन येते. भाकरी, चपाती किंवा पराठा बनविण्यासाठी रोज सकाळी आणि सायंकाळी घरांमध्ये पीठ मळले जाते. पीठ मळल्यानंतर काही वेळाने ते वापरले जाते. अनेकांना सकाळी ऑफिसला जाण्याची घाई असते. त्यामुळे ते अर्ध्यापेक्षा जास्त कामाची पूर्वतयारी आधीच करून ठेवतात. बरेच लोक पीठ मळून फ्रीजमध्ये ठेवतात आणि एक-दोन दिवसांनी वापरतात.

आरोग्यतज्ज्ञ म्हणतात, की पीठ मळल्यानंतर काही तासांतच वापरावे; अन्यथा ते खराब होऊ शकते. ज्यामुळे आरोग्याला हानी पोहोचू शकते. उष्ण वातावरणात ठेवल्यास पीठ लगेच आंबट होण्याची शक्यता जास्त असते. आंबलेले पीठ खाल्ल्यावर पचनावर परिणाम होऊ शकतो. पीठात व्हिटॅमिन सी, फोलेट आणि पॉलीफेनॉल यांसारखे काही पोषक घटक कमी होतात. रात्री मळून ठेवलेले पीठ पुन्हा वापरावे का? याचा आरोग्यावर कसा परिणाम होतो? एका माध्यमाच्या मते- उरलेले पीठ जास्त काळ उघडे ठेवल्याने किंवा खोलीच्या तापमानावर असल्यास बॅक्टेरिया आणि बुरशी लागण्याची शक्यता अधिक असते. पीठात पाणी, ओलावा आणि स्टार्च असतो. जर पीठ ८ ते १० तासांपेक्षा जास्त काळ बाहेर ठेवल्यास ते लगेच काळे पडते. त्याचा आंबट वास येऊ लागतो. ज्यामुळे पोटदुखी, अन्नविषबाधा आणि उलट्या होण्याची शक्यता असते. पीठाची शेल्फ लाइफही त्याच्या प्रक्रियेच्या पातळीनुसार बदलते. मैदा हा गव्हाच्या पीठापेक्षा जास्त काळ ताजे राहते. आहारतज्ज्ञ म्हणतात, की घरी आपण उरलेले पीठ रात्रभर रेफ्रिजरेटरमध्ये ठेवतो आणि दुसऱ्या दिवशी ते पुन्हा वापरतो. पण कधी विचार केला आहे का की हे उरलेले पीठ खाणे खरोखर सुरक्षित आणि आरोग्यदायी आहे का? अनेकांना असे वाटते, की फ्रीजमध्ये पीठ ठेवल्यानंतर ते सुरक्षित राहते. पण हे खरे नाही. हवाबंद डब्यात ८ ते १२ तास पीठ ठेवल्यास ते वापरता येते. पण २४ तासांपेक्षा जास्त काळ पीठ खाण्यायोग्य राहत नाही. रेफ्रिजरेटरचे थंड तापमान बॅक्टेरियाची वाढ कमी करते. म्हणून १२ तासांनंतर पीठाची चव, रंग आणि वास बदलू लागतो आणि ते खराब होते. त्याऐवजी आपण ताजे पीठ वापरल्यास आरोग्याला कोणताही धोका होणार नाही.

# लक्ष्य लालवाणीचा धाडसी निर्णय

## ३० लाख पगाराची नोकरी सोडली, ‘ द बॅड्स ऑफ बॉलीवूड ’मुळे मिळाली प्रसिद्धी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आर्यन खानने दिग्दर्शित आणि लेखन केलेली वेब सीरिज ‘ द बॅड्स ऑफ बॉलीवूड ’ला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. या सीरिजमधील मुख्य अभिनेता लक्ष्य लालवाणी याने चित्रपटसृष्टीत करिअर करण्यासाठी ३० लाख रुपये मासिक पगाराची नोकरी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला.

**पॉडकास्टमधील खुलासा**

एका यूट्यूब चॅनलवरील पॉडकास्टमध्ये लक्ष्यने सांगितले, की त्याच्या वडिलांनी त्याला समजावले. त्यात म्हटले, की चित्रपटसृष्टीत एका दिवसाचा पगार त्यांच्या मासिक कमाईएवढा आहे. निर्मात्यानेही लक्ष्यला विचारले, की महिन्याला ३० लाख पगाराची नोकरी सोडण्याचे धाडस तू कसे केलेस ? लक्ष्यने उत्तर दिले, की टीव्ही क्षेत्रात त्याला दररोज १५ हजार ते २५ हजार रुपये मिळत होते. ज्यामुळे महिन्याला सुमारे ३० लाख रुपये कमाई होत असे.

**टीव्ही ते चित्रपटसृष्टी**

लक्ष्यने वडिलांना नवीन शोच्या ऑफरबाबत सांगितले असता वडिलांनी त्याला पाठिंबा देत सांगितले, की कर, काय हरकत आहे? कारण एका दिवसाचा पगार त्यांच्या मासिक पगाराएवढा (१५ हजार रुपये) होता. चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी लक्ष्यने ‘ वॉरियर हाय ’, ‘ अधुरी कहानी हमारी ’, ‘ प्यार तुने क्या किया ’, ‘ परदेस में है मेरा दिल ’ आणि ‘ पोरस ’ यांसारख्या टीव्ही शोमध्ये काम केले आहे.

**बॉलीवूडमध्ये यश**

लक्ष्यने निखिल नागेश भट दिग्दर्शित ‘ किल ’ या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. ज्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर ‘ द बॅड्स ऑफ बॉलीवूड ’मधील मुख्य भूमिकेने त्याला आणखी प्रसिद्धी मिळाली.



# ७८७ फूट खोल समुद्राखालचा रेल्वे प्रवास

## सायकन टनलचा मार्ग आणि स्थानके जाणून घ्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

परदेशांमध्ये बुलेट ट्रेन ही संकल्पना सामान्य झाली असली, तरी भारतासाठी ती अद्याप कुतूहलाचा विषय आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प जपानी तंत्रज्ञानावर आधारित असून, त्यासाठी जपानची मदत घेतली जात आहे. या ट्रेनचा वेग ताशी ३२० कि.मी. असून, ती ५०८ कि.मी. अंतर अवघ्या २ तासांत पार करेल. मार्ग जमीन, समुद्र आणि उंचवट्यांमधून जाईल. यापैकी २३.३ कि.मी. मार्ग समुद्राखालून असेल. हा प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**जपानमधील समुद्राखालचा रेल्वे प्रवास : सायकन टनल**

भारतातील बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पूर्ततेपूर्वीच जपानमध्ये समुद्राखालचा रेल्वे प्रवास शक्य आहे. जपानमधील सायकन टनल हा जगातील सर्वांत लांब समुद्राखालचा बोगदा आहे, जो हॉन्शू बेटाला होक्काईडो बेटाशी जोडतो. हा बोगदा त्सुगारू स्ट्रेटच्या समुद्राखाली २३.३ कि.मी. अंतर पार करतो. एकूण लांबी ५३.८५ कि.मी. आहे. शिंकानसेन (बुलेट ट्रेन)साठी डिझाईन केलेला हा बोगदा अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. तो केवळ लांबच नाही, तर समुद्रपातळीपासून २४० मीटर (७८७ फूट) खोल आहे. म्हणजे सुमारे २५ मजली इमारतीइतका खोल.

**बोगद्याचा मार्ग : समुद्राखालील थरारक प्रवास**

सायकन टनलचा मार्ग त्सुगारू स्ट्रेटच्या खाडी परिसरातून जातो. हॉन्शू बेटाच्या उत्तरेकडील टोरीबेट (अओमोरी प्रांत) पासून सुरू होऊन, तो समुद्राखाली उतरतो आणि होक्काईडो बेटाच्या दक्षिणेकडील फुकुशिमा येथे पोहोचतो. समुद्राखालचा भाग २३.३ कि.मी. लांब असून, तो घन ज्वालामुखी खडकांमधून बांधला गेला आहे. यामुळे भूकंपप्रवण प्रदेशातही सुरक्षितता सुनिश्चित होते. बोगद्यातील ट्रॅक ट्रिपल स्लॅब ट्रॅक आहे, जो बुलेट ट्रेनसाठी योग्य आहे. प्रवासादरम्यान समुद्राखाली असलेल्या खोलीमुळे थरारक अनुभव मिळतो. पर्यटकांसाठी हा मार्ग आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे.

**दोन खास स्थानके : आपत्कालीन आणि पर्यटनासाठी**

सायकन टनलमध्ये दोन खास स्थानके आहेत. जी जगातील एकमेव समुद्राखालील रेल्वेस्थानके आहेत. ही स्थानके मुख्यतः आपत्कालीन बचावासाठी बांधली गेली असली, तरी पर्यटकांसाठीही खुली आहेत.

**टॅपी-कायटोई स्टेशन :** हॉन्शू बेटाच्या बाजूला, समुद्राखालच्या प्रवेशद्वाराजवळ. येथून पर्यटक उतरून प्रदर्शने पाहू शकतात आणि समुद्राखालचा अनुभव घेता येतो.

योशिओका-कायटोई स्टेशन : होक्काईडो बेटाच्या बाजूला, बोगद्याच्या दुसऱ्या टोकावर. येथेही प्रदर्शने आणि फेरफटका मारण्याची सोय आहे. या स्थानकांमुळे प्रवाशांना समुद्राखालचा प्रवास अधिक रोमांचक आणि सुरक्षित वाटतो.

### निर्मितीची आश्चर्यकारक गोष्ट

सायकन टनलची योजना १९५४ मध्ये आखली गेली. जेव्हा एका तायफूनमुळे फेरी डुबून १,४३० लोकांचा मृत्यू झाला. यानंतर सुरक्षित पर्याय म्हणून बोगदा बांधण्याचा निर्णय झाला. १९६४ मध्ये काम सुरू झाले. १९७१ मध्ये मुख्य बोगदा खणण्यास सुरूवात झाली. १९८५ मध्ये ब्रेकथ्रू झाला, मार्च १९८८ मध्ये तो पूर्ण झाला. एकूण खर्च १.१ ट्रिलियन येन (सुमारे ७ बिलियन डॉलर) इतका झाला. जो अंदाजापेक्षा १२ पट जास्त होता. भूकंप आणि त्सुनामी यांसारख्या आपत्तींसाठी विशेष डिझाईन केलेला हा बोगदा आजही जपानच्या अभियांत्रिकीचा अभिमान आहे. सायकन टनल हा केवळ अभियांत्रिकीचा चमत्कारच नाही, तर समुद्राखालचा प्रवास कसा शक्य होऊ शकतो याचे जीवंत उदाहरण आहे. भारतातील बुलेट ट्रेन प्रकल्पासाठीही हे प्रेरणादायी आहे. हा बोगदा पर्यटकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव आहे. समुद्राखाली धावणारी ट्रेन आणि त्यातील थरार.

# मोबाईल रिस्टार्ट करायचा की पॉवर ऑफ ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोबाईलमध्ये पॉवर ऑफ आणि रिस्टार्ट असे दोन पर्याय आहेत. मात्र, त्यांचे काम एकच आहे. मग दोन्ही पर्याय देण्याला अर्थ काय ? त्याचे फायदे काय? कधी कोणता वापरायचा? याबाबत जाणुन घेऊयात.

मोबाईल बंद केल्याने तो पुन्हा चालू करावा लागतो. रिस्टार्ट केल्याने मोबाईल बंद होतो व आपोआप चालू होतो. दर आठवड्याला तुमचा मोबाईल रिस्टार्ट केल्याने मेमरी लीक होणे टाळण्यास मदत होते. एका अहवालात असे म्हटले, आहे की जेव्हा एखाद्या ॲपला काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मेमरी आवश्यक असते, तेव्हा मेमरी लीक होते. मात्र, जेव्हा ॲप वापरात नसते तेव्हा मेमरी लीक होत नाही. मोबाईल रिस्टार्ट केल्याने कनेक्टिव्हिटी समस्या दूर होण्यास मदत होते. जुने स्मार्टफोन कधीकधी डेटा आणि वाय-फायशी कनेक्ट होत नाहीत. मात्र, मोबाईल रिस्टार्ट केल्याने ते पुन्हा कनेक्ट होतात. पॉवर ऑफ केल्याने त्याचा कॅशे डेटा साफ होण्यास मदत होते. ज्यामुळे मोबाईल अधिक कार्यक्षमतेने काम करू शकेल. मोबाईल चालू असताना बॅटरीच्या आरोग्यावर ताण येऊ शकणारे बॅकग्राउंड ॲप्स देखील साफ केले पाहिजेत. जेव्हा मोबाईल हँग होतो, ॲप्स व्यवस्थित चालत नाहीत किंवा सॉफ्टवेअर एरर येतात तेव्हा मोबाईल रिस्टार्ट करणे सामान्य आहे.

# पाचन की संजीवनी मूली

## सर्दियों में इसके साथ भूलकर भी न खाएं ये ५ चीजें, बन सकता है जहर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मूली पाचन तंत्र की संजीवनी बूटी है, लेकिन आयुर्वेद के अनुसार, कुछ खाद्य पदार्थों के साथ इसका सेवन हानिकारक हो सकता है। आयुर्वेदिक विशेषज्ञ डॉ. प्रताप चौहान बताते हैं कि मूली के साथ गलत फूड कॉम्बिनेशन से पेट में गैस, अपच, त्वचा की समस्याएं और यहां तक कि गंभीर रोग भी हो सकते हैं। मूली में फाइबर, विटामिन C, पोटैशियम, कैल्शियम और एंटीऑक्सीडेंट्स होते हैं, जो पाचन, लिवर, किडनी और इम्यून सिस्टम को मजबूत करते हैं। यह ब्लड प्रेशर नियंत्रित करती है, त्वचा को स्वस्थ रखती है और वजन घटाने में मदद करती है। सर्दियों में मूली शरीर को गर्मी और ऊर्जा देती है, लेकिन इन ५ चीजों के साथ इसका सेवन जहर की तरह असर कर सकता है। आइए जानते हैं, मूली के साथ किन चीजों से परहेज करना चाहिए।

**मूली के फायदे**

मूली हाई फाइबर से भरपूर होती है, जो पेट की सफाई और पाचन में मदद करती है। इसके एंजाइम्स और प्राकृतिक एसिड्स भोजन को तोड़ने और पोषक तत्वों के अवशोषण में सुधार करते हैं। नियमित सेवन से कब्ज, पेट की सूजन, गैस, अम्लता और अपच जैसी समस्याएं दूर रहती हैं। यह लिवर और किडनी को डिटॉक्स करने में भी कारगर है। लेकिन गलत फूड कॉम्बिनेशन इसके फायदों को नुकसान में बदल सकता है।



## मूली के साथ न खाएं ये ५ चीजें

आयुर्वेद के अनुसार, मूली के साथ इन खाद्य पदार्थों का सेवन करने से बचें:

**संतरा और खट्टे फल :** मूली के साथ संतरा या अन्य खट्टे फल (नींबू, मौसमी) खाना आयुर्वेद में वर्जित है। यह कॉम्बिनेशन पेट में रासायनिक प्रतिक्रिया पैदा करता है, जिससे गैस, अपच, जलन, त्वचा पर एलर्जी या सूजन हो सकती है।

**सलाह :** मूली और खट्टे फलों के बीच कम से कम १-२ घंटे का अंतर रखें।

**करेला :** मूली और करेले, दोनों ठंडी प्रकृति के होते हैं। इन्हें एक साथ खाने से शरीर में टॉक्सिन्स बन सकते हैं, जिससे गैस, अपच, पेट दर्द या इम्यून सिस्टम की कमजोरी हो सकती है। लंबे समय तक यह कॉम्बिनेशन एलर्जी और सूजन का कारण बन सकता है।

सलाह : मूली और करेले को अलग-अलग समय पर खाएं।

**दूध :** मूली और दूध का संयोजन आयुर्वेद में विषाक्त माना जाता है। यह पाचन तंत्र को बाधित करता है, जिससे गैस, भारीपन, अपच या त्वचा पर चकत्ते और एलर्जी हो सकती है। ठंडी प्रकृति के दूध और मूली से शरीर में असंतुलन पैदा होता है।

**सलाह :** मूली खाने के बाद दूध पीने के लिए २-३ घंटे का अंतर रखें।

**शहद :** मूली के साथ शहद का सेवन टॉक्सिन्स पैदा करता है, जो पेट, किडनी और त्वचा पर बुरा असर डाल सकता है। यह वात और कफ दोष को बढ़ाता है, जिससे गैस, अपच, जलन या एलर्जी की समस्या हो सकती है।

**सलाह :** मूली और शहद को एक साथ खाने से पूरी तरह बचें।

**दही :** मूली और दही, दोनों ठंडी प्रकृति के होने के कारण एक साथ खाने से पाचन पर भारी पड़ता है। इससे गैस, अपच, भारीपन, सर्दी, खांसी या गले में खराश जैसी समस्याएं हो सकती हैं।

**सलाह :** मूली खाने के बाद दही लेने के लिए कम से कम १-२ घंटे का अंतर रखें।

मूली पाचन के लिए वरदान है, लेकिन इसके साथ गलत खाद्य पदार्थों का सेवन सेहत को नुकसान पहुंचा सकता है। आयुर्वेदिक विशेषज्ञों की सलाह मानें और मूली के साथ संतरा, करेला, दूध, शहद और दही जैसे फूड्स से परहेज करें। सही खान-पान के साथ मूली के फायदों को अधिकतम करें और सेहतमंद रहें।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ‘टीईटी’ पेपर लीकचा पर्दाफाश!

## सोळा लाखांच्या मुद्देमालासह आरोपींना रंगेहात पकडले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**कोल्हापूर ग्रामीण पोलिसांनी रविवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपर लीक करण्याच्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांकडून कागदपत्रे आणि पैशांची मागणी करणाऱ्या सात जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत १६ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**




२३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर एक दिवस अगोदर देतो, असे सांगून आरोपींनी काही जणांना बोलाविले होते. त्यानंतर आलेल्या उमेदवारांकडून आरोपींनी मूळ शैक्षणिक कागदपत्रे आणि पैशांची मागणी केली. पैसे आणि कागदपत्रे घेऊन ते परीक्षेतील पेपरचे झेरॉक्स देणार होते. मात्र, त्याअगोदर पोलिसांना या प्रकरणाचा सुगावा लागला. पोलिसांनी धाड टाकून आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींना ताब्यात घेताना त्यांच्याकडून काही विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे, प्रिंटर, मोबाईल, चारचाकी वाहन आदी वस्तू जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाल एकूण १६ लाख रुपयांपेक्षा जास्त होता. स्थानिक गुन्हे शाखा आणि मुरगुड पोलीस ठाण्यातील पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

**कसे उघड पडले रॅकेट?**

हे रॅकेट पात्र उमेदवारांना लक्ष्य करीत होते. राधानागरी तालुक्यातील दत्तात्रय चव्हाण आणि गुरुनाथ चौगुले यांनी या उमेदवारांशी संपर्क साधला होता. परीक्षेच्या आदल्या रात्री परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती देण्याचे आमिष दाखविले होते. मूळ शैक्षणिक कागदपत्रे आणि पैशांची मागणी केली होती. या व्यवहारासाठी विद्यार्थ्यांना सोनगे (ता. कागल) येथील एका ठिकाणी बोलाविण्यात आले होते. कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक योगेशकुमार साओ यांना या फसवणुकीची माहिती मिळाली. या अनुषंगाने त्यांनी कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर कोल्हापूर ग्रामीण पोलिसांनी सोनगे येथील शिवकृपा फर्निचर मॉलवर पहाटे धाड टाकली. या धाडीत दत्तात्रय आनंद चव्हाण, गुरुनाथ गणपत चौगुले, अक्षय नामदेव कुंभार, किरण सताप्पा बरकले आणि नागेश दिलीप शेंडगे यांच्यासह एकूण सात जणांना अटक केली. चौकशीत त्यांनी सांगितले, की ते शेंडीवाडी, गडहिंग्लज येथील राहुल अनिल पाटील यांच्यासाठी आम्ही काम करत होते. राहुल पाटील हाच त्यांना परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती देणार होता. त्यानंतर पोलिसांनी राहुल अनिल पाटील आणि दयानंद भैरू साळवी यांना मुधळ तिट्टा (ता. कागल) येथून अटक केली. राहुल पाटीलने कबुली, दिली की त्याला महेश भगवान गायकवाड सातारा येथून टीईटी परीक्षेचा पेपर देणार होता. राहुल पाटीलचे काम विद्यार्थ्यांना पेपरच्या झेरॉक्स प्रती वाटणे हे होते. यासाठी तो विद्यार्थ्यांकडून सुमारे तीन लाख रुपये घेत होता. त्यांची मूळ शैक्षणिक कागदपत्रे जमा करत होता. निकालानंतर ही कागदपत्रे परत देण्याचे आश्वासन त्यांना देत होता. या तपासातून एका मोठ्या नेटवर्कचा उलगडा झाला. कारवाईत कोल्हापूर आणि कराड येथील आणखी दहा साथीदारांना ताब्यात घेण्यात आले.

> “या प्रकरणाशी आमचा कुठलाही संबंध नाही. ही पोलिसांची कारवाई आहे. ही कारवाई झाल्यानंतर आम्ही तेथील शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधून माहिती घेतली. तेव्हा या घटनेत कोणताही पेपर आढळून आला नाही.
> महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) पेपर छपाई खूप गोपनीय असते. सुरुवातीला पेपरच्या काही दिवस अगोदर परीक्षेचे पेपर जिल्हा कोषागारात गोपनीय पद्धतीने आणले जातात. तेथे २४ तास कडक पहारा असतो. त्यानंतर ज्या दिवशी परीक्षा आहे, त्या दिवशी सकाळी झोनल अधिकारी व्हिडिओ ग्राफीमध्ये ते पेपर परीक्षा केंद्रांवर पाठवतात. यामुळे कोणतीही टीईटी परीक्षेत कोणतीही पेपरफुटी झाली नाही.
> – **डॉ. नंदकुमार बेडसे,** अध्यक्ष, परीक्षा परिषद.

> “ज्यावेळी छापा टाकून कारवाई केली तेव्हा तेथे शिक्षक पात्रता परीक्षेचा कोणताही पेपर आढळेला नाही. तेथून काही विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे जप्त करण्यात आली. प्रिंटर, मोबाईल फोन, एक कार आणि इतर साहित्य जप्त केले आहे.
> –**शिवाजी करे,** सहायक पोलीस निरीक्षक, मुरगूड पोलिस ठाणे.

> “शिक्षक पात्रता परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणी ‘एसआयटी’ चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची आम्ही मागणी केली आहे. टीईटी पेपरच्या दिवशी राज्यभरात अनेक ठिकाणी झालेल्या घटनांमुळे परीक्षा पद्धतीवरील विश्वासार्हता कमी झाली आहे. परीक्षार्थींच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आम्ही परीक्षा परिषदेकडे चौकशीची मागणी केली आहे.
> – **संदीप कांबळे,** अध्यक्ष, युवा शैक्षणिक व सामाजिक न्याय संघटना, महाराष्ट्र.

## न्यायालयाच्या निर्णयानंतर गोंधळ !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला राज्यभरातून विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राष्ट्रीय तंत्रशिक्षण परिषदेकडे पत्रव्यवहार केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालामध्ये जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद तसेच अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना टीईटी अनिवार्य होणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयाविरोधात अनेक शिक्षक संघटनांनी न्यायालयात फेरविचार याचिका दाखल केली आहे. मात्र, राज्य सरकारने फेरविचार याचिका दाखल न करता, यासाठी कायद्यात बदल करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांसह संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने फेरविचार याचिका दाखल करावी, अशी मागणी केली होती. मात्र, न्यायालय ही याचिका फेटाळण्याची शक्यता असल्याचे राज्य सरकारने सांगितले आहे.

# महाराष्ट्रातील ‘त्या’ शिक्षकांना पदोन्नती नको!

## मुंबई उच्च न्यायालयाचा ‘टीईटी’बाबत जिल्हा प्रशासनांना आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/सीटीईटी) उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती देऊ नये, असा मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश आहे. ठाणे जिल्हा परिषदेने या नियमाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. टीईटी, सीटीईटी उत्तीर्ण आणि घोटाळ्यात नसलेल्यांचाच पदोन्नतीसाठी विचार करावा, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या संदर्भात जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना २७ नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

शिक्षक म्हणून सेवेत रुजू होण्याबरोबरच पदोन्नतीसाठीही शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच ‘टीईटी’ अथवा ‘सीटीईटी’ उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. हे कायदेशीर चित्र उच्च न्यायालयानंतर सर्वोच्च न्यायालयानेही दिलेल्या निवाड्याने स्पष्ट झालेले आहे. मात्र, असे असताना जिल्हा प्रशासनांकडून पदोन्नतीच्या बाबतीत त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच ही पात्रता नसलेल्या कोणत्याही शिक्षकाला पदोन्नती देऊ नये, असा अंतरिम आदेश दिला.



टीईटी अथवा सीटीईटी ही परीक्षा ज्यांनी उत्तीर्ण केलेली आहे आणि ज्यांची नावे टीईटी परीक्षा घोटाळा २०१८ किंवा २०१९ यामध्ये गुंतलेली नाहीत, अशांचाच पदोन्नतीसाठी विचार करावा, असे न्यायाधीश रवींद्र घुगे व न्यायाधीश अश्विन भोबे यांच्या खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले आहे.

ठाणे जिल्हा परिषदेने पदोन्नतीसाठी तयार केलेल्या यादीला आव्हान देणाऱ्या याचिकेच्या निमित्ताने खंडपीठाने हा अंतरिम आदेश दिला आहे. अलंकार वारघडे व अन्य सात शिक्षकांनी ॲड. प्रीती वाळिंबे व ॲड. वैष्णवी नागरगोजे यांच्यामार्फत याप्रश्नी रिट याचिका केली आहे. शिक्षक म्हणून नियुक्तीसाठी आणि पदोन्नतीसाठीही टीईटी अथवा सीटीईटी कायद्याने अनिवार्य आहे. शिवाय मुंबई उच्च न्यायालयासह अन्य राज्यांतील उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयानेही हे निवाड्यांद्वारे स्पष्ट केलेले आहे. तरीही ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) व शिक्षण अधिकारी यांनी मनमानी करत ती परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या अनेक शिक्षकांची विस्तार अधिकारी या पदावरील नियोजित पदोन्नतीसाठी यादी बनवली आहे. त्याउलट या सात शिक्षकांनी टीईटी अथवा सीटीईटी उत्तीर्ण असल्याने पात्र असूनही आमचा पदोन्नतीसाठी विचार केलेला नाही, असे याचिकाकर्त्यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणले. त्याची खंडपीठाने गंभीर दखल घेतली. याप्रश्नी सर्वोच्च न्यायालयाचा १ सप्टेंबर २०२५ रोजीचा आणि मुंबई उच्च न्यायालयाचा ११ सप्टेंबर २०२५ रोजीचा निवाडा सुस्पष्ट आहे. तरीही ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने मार्गदर्शनासाठी शालेय शिक्षण प्रधान सचिवांना ३१ ऑक्टोबरला याविषयी पत्र लिहिले. त्यावरून जिल्हा परिषद प्रशासनाने ते निवाडे वाचलेलेच नाहीत. ते वाचले असते तर प्रधान सचिवांचे मार्गदर्शन मागण्याची गरज भासली नसती, असे निरीक्षण खंडपीठाने अंतरिम आदेशात नोंदविले.

### ‘टीईटी’चा असा झाला कायदेशीर ‘प्रवास’

- केंद्र सरकारच्या अखत्यारीतील ‘एनसीटीई’ ने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २३ ऑगस्ट २००८ रोजी अधिसूचना जारी करून टीईटी अनिवार्य केली.
- राज्य सरकारने २३ ऑगस्ट २०१३ रोजीच्या ‘जीआर’ द्वारे शिक्षकांसाठी तो निकष बंधनकारक केला.
- जीआरच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने १२ डिसेंबर २०१७ रोजी फेटाळली. ती परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी सेवेतील शिक्षकांना दिलेली २०१५ पर्यंतची मुदत नंतर ३१ मार्च २०१९ अशी वाढविण्यात आली.
- टीईटी ही नियुक्ती व पदोन्नतीसाठीही अनिवार्य असल्याचे ‘एनसीटीईटी’ चे ११ सप्टेंबर २०२३ रोजी स्पष्टीकरण. पदोन्नतीसाठीही बंधनकारक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी ‘अंजुमन इशात-ए-तलीम ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र सरकार’ या निवाड्यात स्पष्ट केले.

# टीईटी परीक्षा आता वर्षातून दोनदा

## राज्य परीक्षा परिषदेचा निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील शिक्षकांसाठी एक महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आता वर्षातून दोनदा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ही परीक्षा सर्व शिक्षकांसाठी अनिवार्य करण्यात आली आहे. केवळ पाच वर्षे सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना यातून सूट देण्यात आली आहे. या निर्णयानुसार, गैरप्रकार रोखण्यासाठी पुढील टीईटीपासून प्रत्येक परीक्षार्थीची आधारकार्डद्वारे डिजिटल पडताळणी होणार आहे. सर्व कार्यरत शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. ज्या अंतर्गत एकूण चार परीक्षा आयोजित केल्या जातील. या निर्णयामुळे परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येण्याची आणि शिक्षकांना पात्रता सिद्ध करण्यासाठी अधिक संधी मिळण्याची अपेक्षा आहे.

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234






# श्री खंडेरायांचा षड्रात्रौत्सव प्रारंभ म्हणजेच देव दीपावली

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

श्री खंडेरायांचा षड्रात्रौत्सव प्रारंभ म्हणजेच देव दीपावली. चंपाषष्ठी उत्सव मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा अर्थात बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू होत आहे.

यामध्ये देवीच्या नवरात्रामध्ये ज्याप्रमाणे मातीचा घट स्थापन केला जातो त्याप्रमाणे षड:रात्रोत्सवामध्ये कलश स्थापन केला जातो. घटस्थापनेच्या दिवशी आपल्या घरातील देवघर स्वच्छ करून घ्यावे. सर्व देवतांच्या मूर्तींची स्वच्छ पाकाळणी ( प्रक्षालन) करून पंचामृताने ( दूध, दही, तूप, मध, साखर.) अभिषेक घालून षोडशोपचारे पूजा करावी. देवघरातील सर्व टाक आणि मूर्तींना नूतन वस्त्रासोबत विड्याच्या पानांचे आसन द्यावे. नंदादीप घासून-पुसून स्वच्छ करून सहा दिवस सतत तेवत राहील, या पद्धतीने वात लावून प्रज्वलित करावा. ताम्हणामध्ये तांदूळ किंवा धान्य ठेवून त्यावर तांब्या अथवा पंचपात्र मांडावे. श्रीफळ कलशाची विधीवत पूजा करावी. त्याला बाहेरील बाजूने फुले-पानांची माळ बांधावी. अशा रीतीने घटस्थापना झाल्यानंतर पाच अथवा सात पानांची माळ टांगती अडकवावी/लावावी. गोड नैवेद्य दाखवून आरती करावी.

### मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया ते मार्गशीर्ष शुद्ध पंचमी

रोज सकाळी नियमितपणे ( श्री खंडोबा यांच्या टाकावर फक्त फुलांनी किंचित जल प्रक्षालन करून इतर ) देवाची पूजा करावी. देवाला गोड नैवेद्य दाखवावा. फुलांची माळ तयार करून घटावर लावावी. उत्सव कालावधीमध्ये घरातील वातावरण पवित्र आणि मंगलमय ठेवावे. श्री मल्हारी महात्म्य, श्री मार्तंड विजयग्रंथ यांचे पारायण, मल्हारी नामस्मरण करावे, ॐ नमो मार्तंड भैरवाय नमः हा मंत्र १०८ वेळा म्हणावा. उपवास बसता-उठता, शक्यतो जमल्यास रोज, एकभुक्त किंवा फलाहार अशा पद्धतीने करावा.

### मार्गशीर्ष शुद्ध पंचमी

श्रीक्षेत्र जेजुरी येथे श्रींना तैलस्नान घातले जाते. त्याला श्री खंडोबा आणि म्हाळसा यांच्या विवाहातील तेलवण विधी म्हणतात. या दिवशी तिन्हीसांजेला आपल्या घरातील व्यक्तींच्या दुप्पट संख्येमध्ये बाजरीचे नागदिवे आणि दोन मुटके तयार करावेत.



त्यासोबत पुरणाचे पाच दिवे तयार करून घ्यावेत. सर्व दिवे शुद्ध तुपाच्या वातींनी प्रज्वलित करून देवाला औक्षण करावे.

### मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी अर्थात चंपाषष्ठी

चंपाषष्ठी श्री खंडेराय यांच्या उपासनेतील अत्यंत महत्त्वपूर्ण उत्सव, श्री मल्हारी मार्तंड यांच्या षड्रात्रोत्सवाचा सांगता दिवस. या दिवशी मार्तंड भैरव यांनी मल्लासूर दैत्याचा संहार केला व भूतलावरील आरिष्ट टाळले. विजयोत्सवामध्ये देवगणांनी मार्तंड भैरव यांच्यावर भंडाराबरोबरच चंपावृष्टी अर्थात चाफ्याची पुष्पवृष्टी केली म्हणूनच मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीला चंपाषष्ठी असे नाव मिळाले. देवघरातील सर्व देवतांच्या मूर्तींची पंचामृताने ( दूध, दही, तूप, मध, साखर.) अभिषेक घालून षोडशोपचारे अथवा पंचोपचारे अथवा यथोमिलीतोपचारे पूजा करावी, चाफ्याची फुले देवाला अर्पण करावीत. दिवटी प्रज्वलीत करून देवांना ओवाळावी. पुरणा-वरणाचा नैवेद्य आणि त्यासोबत खीर, भरीत रोडग्याचा नैवेद्य देवाला दाखवावा. घोडा, कुत्रा आणि गाय यांना घास द्यावा. घटोत्थापन करून आप्तेष्टांना सोबत घेऊन तळीभंडार करावा. उपस्थितांना भंडार लावून पानसुपारी, खोबरे द्यावे.

विडे खोबरें भंडार । यांनी तळी भरावी सुंदर । त्रिवार करावा जयजयकार । ' सदानंदाचा येळकोट येळकोट येळकोट ' ।। ९० ।।
जन्मा येऊनी एकदांतरी । पाहावी खंडोबाची जेजुरी । श्रद्धा ठेवुनी त्याचेवरी । मनीं मागणें मागावें । । ९१ ।।
जय खंडोबा जय म्हाळसादेवी । सदैव आम्हांसी सुखी ठेवी । योगक्षेमाची चिंता नसावी । विजय व्हावा सर्वत्र ।। ९२ ।।
पत्नी सुना कन्या पुत्र । कुटुंबपरिवार आणि पौत्र । बंधुभगिनी आप्त मित्र । सुखी असोत सर्वही ।। ९३ ।।
नोकरचाकर गुरें-ढोरें । विद्या वैभव मिलो सारें । वाहनसौख्यही लाभों खरें । शत्रु कोणी नसवा ।। ९४ ।।
दुरित अवघे व्हावें दूर । ज्ञानसूर्य जावो अज्ञानतिमिर । धनधान्य मिलो अपार । हीच पायी प्रार्थना ।। ९५ ।।
अशा रीतीने कुलस्वामी खंडेराय यांची उपासना करून लाभ घ्यावा.



### तळी भंडार करताना म्हणावयाचे पद

आगडदुम नगारा, सोन्याची जेजुरी । निळा घोडा, पावमें तोडा ।
मस्तकी तुरा, बेंबी हिरा । अंगावर शाल, सदाही लाल ।
म्हाळसा सुंदरी, आरती करी । खोबऱ्याचा कुटका, भंडाराचा भंडका ।
बोला सदानंदाचा येळकोट। खंडेराव महाराज की जय ।
हरहर महादेव । चिंतामणी मोरया ।
आनंदीचा उदय उदय, भैरीचा चांग भले । सदानंदाचा येळकोट ।
**खंडेराव महाराज की जय ।**



# कथा खंडेरायांची...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

खंडोबा किंवा खंडेराय हे मुख्यत्वे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांतील लोकप्रिय हिंदू दैवत आहे. हे दैवत महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत आहे. खंडोबांच्या मूर्ती बैठ्या, उभ्या व अश्वारूढ अशा स्वरूपात असून हातात डमरू, त्रिशूळ, खंडा आणि पानपत्र, चतुर्भुज, कपाळाला भंडारा असे रूप असते. मल्ह + अरी अशी मल्हारी शब्दाची फोड असून मल्ल राक्षसाचा शत्रू असा त्याचा अर्थ आहे. म्हाळसेचा पती म्हणून खंडोब यांना म्हाळसाकांत असे म्हणतात. येळकोटी म्हणजे सात कोटी सैनिकांचे नायक. खंडेराय (राय = राजा) हे नावही खंडोबांचे राजेपण दर्शविते. कर्नाटकात खंडोबा यांना मैलार किंवा खंडू गौडा, तर आंध्रात मल्लाण्णा नावाने ओळखतात.

महात्मा फुले यांनी खंडोबा या देवतेस बळीराजाच्या राज्यातील महाराष्ट्र क्षेत्राचा अधिपती मानले आहे. महाराष्ट्र क्षेत्र विस्ताराने मोठे असल्याने बळीराजाने या प्रदेशाचे नऊ खंड केले. जेजुरीचा क्षेत्रपती असणारा खंडोबा त्यातील एक होय. खंडोबाचे मार्तंड हे नाव मार-तोंड यावरून आले असल्याचे मानले जाते.

जेजुरीचे मंदिर वीरपाल वीरमल्ल याने इसवी सन १३८१ मध्ये बांधले. १६३५ मध्ये खटावच्या राघो मंबाजीने याचा विस्तार केला. बंगाली संत चैतन्य महाप्रभू यांनी या मंदिरास भेट दिली होती. मुरळींचा देहविक्री व्यवसाय बंद करण्याचे प्रयत्न केले होते, असे ऐतिहासिक उल्लेख आहेत. जेजुरी गडावरील शीलालेखांत विठ्ठल सदाशिव विंचूरकर, मल्हारराव होळकर वगैरेंचे उल्लेख आहेत.

खंडोबा हे दैवत बहुपत्नीक आहे. खंडोबा यांच्या पत्नी वेगवेगळ्या जातींतील आहेत. अशा बहुपत्नीकत्वामुळे त्या जातींमध्ये एकप्रकारचा सांस्कृतिक धागा तयार झाला आहे. खंडोबा यांची पहिली पत्नी म्हाळसा लिंगायत आहे. दुसरी पत्नी बाणाई (वा पालाई) धनगर आहे. म्हाळसा हा मोहिनी व पार्वती यांचा संयुक्त अवतार मानण्यात येतो. म्हाळसा नेवाश्याच्या तिमशेट नावाच्या व्यापाऱ्याच्या घरात जन्मली. स्वप्नात मिळालेल्या खंडोबांच्या दृष्टांतानुसार तिमशेटने पाली (जि. सातारा) येथे पौष पौर्णिमेस दोघांचे लग्न लावले, असे सांगितले जाते.

दुसरी पत्नी बाणाई (बनाई?) इंद्राची मुलगी असल्याचे मानले जाते. ही एका धनगरास सापडली. बाणाईला जेजुरी येथे पती मिळेल, असे वर्तविण्यात आले. जेजुरीस बाणाईने खंडोबास पाहिले तेथे दोघे प्रेमात पडले. बाणाईचा सहवास मिळण्यासाठी खंडोबाने आपली पत्नी म्हाळसा हिच्यासोबत सारीपाटाचा डाव मांडला. डाव हरणाऱ्यास बारा वर्षे वनवास ही अट होती. खंडोबा हा डाव हरला. धनगराचे रूप घेऊन बाणाईच्या पित्याकडे नोकर म्हणून राहू लागला. एक दिवस खंडोबाने सारी मेंढरे मारली व बाणाईच्या पित्यास बाणाईशी लग्न लावल्यास सारी मेंढरे जीवंत करतो, असे सांगितल्याने बाणाईचे लग्न या धनगराशी झाले.

# खंडोबा महात्म्य

कर्नाटकातील बिदरजवळ मैलार स्थान आहे. तेथील प्रेमपुरीचे खंडोबा प्रेमपुरी. नळदुर्ग-पाली (जिल्हा सातारा) असे करीत जेजुरीत येऊन स्थिरावले. मराठी परंपरेत खंडोबा हे मूळचे कानडी देव मानले जातात. त्यांचे खंडोबा हे नाव त्यांच्या खंडा या शस्त्रावरून आले आहे. शिवाय संस्कृत स्कंद या शब्दाचा खंड हा अपभ्रंश आहे, असेही मानले जाते. याखेरीज मल्हारी, खंडेराय, मार्तंड भैरव, म्हाळसाकांत, रवळनाथ, येळकोट म्हणजे सात कोटी सैन्य बाळगलेले. ही त्यांची मराठी मातीतील नावे आहेत. कर्नाटकात खंडोबांना मैलार किंवा खंडू गौडा, तर आंध्रात मल्लाण्णा नावाने पूजतात. याखेरीज मल्लखान आणि अजमत खान (अजमत-चमत्कार) ही नावे त्यांच्या मुस्लीम भक्तांमध्ये लोकप्रिय आहेत. ते त्यांच्या खंडा या शस्त्रास मल्लखान की गदा असे म्हणतात. मल्ल अरी अशी मल्हारी शब्दाची फोड असून, मल्ल राक्षसाचा शत्रू असा त्याचा अर्थ आहे.

खंडोबा अकराव्या शतकात लोकप्रिय ठरले. हे शिव रुद्राचा पूर्णावतार मानले जातात. शिव यांची कुटुंबवत्सल वृत्ती याही अवतारात ठायी-ठायी दिसते. येथे त्यांच्या कुटुंबात म्हाळसा, बानू या त्यांच्या दोन पत्नी, मल्ल दैत्याच्या पायाचा चावा घेणारा कुत्रा आणि निळा घोडा हा नंदीचा अवतार मानला गेला आहे. खंडोबा हे दैवत वैदिक पशुपती रुद्राप्रमाणे घोडा, कुत्रा यांच्याशी संबंधित आहेत. खंडोबा महाराष्ट्रातील लोकजीवनात स्वतःहून रंगून गेले आहेत. त्यांच्या प्रेमकथाही त्यांच्यासारख्याच लोभसवाण्या. ते बहुपत्नीक आहे. खंडोबा यांची पहिली पत्नी म्हाळसा लिंगायत समाजाशी जोडलेली आहे. दुसरी पत्नी बाणाई धनगर समाजातील आहे.

खंडोबा आणि बानू यांची प्रेमकथा खूपच सुरस. बानू ही इंद्रकन्या एका धनगरास सापडते. जेजुरीत बानू आणि खंडेरायांची भेट होऊन दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडतात. बाणाईचा सहवास मिळविण्यासाठी खंडेरायांनी प्रथम पत्नी म्हाळसेसोबत सारीपाटाचा डाव मांडला. डाव हरणाऱ्यास १२ वर्षे वनवास ही अट होती. खंडोबा जाणीवपूर्वक हा डाव हरतात. धनगराचे रूप घेऊन बाणाईच्या घरी ते नोकर म्हणून राहू लागतात. एक दिवस खंडोबा सारी मेंढरे मारतात. बाणाईशी लग्न लावून दिल्यास सारी मेंढरे जीवंत करीन, अशी अट घालतात. येथे त्यांचा विवाह बानूशी होतो. काही ठिकाणी खंडोबांच्या पाच पत्नींचा उल्लेख आहे.

म्हाळसा, बाणाई, रभाई, फुलाई आणि पाचवी मुस्लीम चांदाई. पण जेजुरीला म्हाळसा आणि बानू या दोघी त्यांच्यासोबत आहेत. जेजुरीला ऐतिहासिक वारसाही आहे. शिवाजी राजे आणि शहाजी राजेंची खूप वर्षांनंतर येथे भेट झाली होती. तेव्हा जेजुरी दक्षिण प्रांतातील एक मुख्य किल्ला होता. जेजुरगडाच्या मागे उंच डोंगरावर असलेले कडेपठार हे खंडोबाचे मूळ स्थान आहे. मार्गशीर्षातील या सहा दिवसांत भंडाऱ्याच्या सोन्याच्या रंगात जेजुरी सोन्याची होते. कोणी दिवटी, बुधली घेऊन देवाला ओवाळते, तर वाघ्या-मुरळी जागरण गोंधळ घालतात.

खंडोबा हे शिव, भैरव आणि सूर्य या तीन देवतांचे एकत्रित स्वरूप आहे. म्हणूनच खंडोबांचा उपास हा आदित्यवारी म्हणजे रविवारी करण्याचा प्रघात आहे. बेल, भंडारा, दवणा खंडोबा यांना विशेष प्रिय. कांदा त्यांच्या आवडीचा. काही ज्ञातींत ते मांसाहारही करतात. पण वांग्याचे भरीत, भाकरी, पुरणपोळी असे स्थानिक पदार्थ त्यांच्या विशेष आवडीचे. खंडेरायांचा घोडा हा चंद्राचे दुसरे रूप मानले जाते. भगवान श्रीकृष्ण लहान असताना त्यांनी खंडोबांची अवहेलना केल्याने त्यांना कुत्र्याचे रूप घ्यावे लागले. खंडोबांची पूजा प्रतीकेही आजच्या काळाशी सुसंगत अशी आहेत. हा टाक चांदीचा असतो. त्यावर खंडेराय आणि म्हाळसा यांची अश्वारूढ प्रतिकृती असते. बहुतेकांच्या देवघरात खंडोबांचा टाक असतोच. दिवटी, बुधली हे ज्ञानाचे प्रतीक आहे. दिवटीच्या वरील भागात कापडाचा पलिता लावून त्यावर बुधलीने तेल घातले जाते. गाठा अथवा शिक्का हे त्यांच्या शक्तीचे, तेजस्वितेचे प्रतीक आहे. महाराष्ट्रातील हे लोकदेव आपल्या वीरश्रीयुक्त तेजस्वितेने मराठी मनातील स्फुलिंग चेतवत आहेत. त्यांचे पूजन म्हणजे शक्तीचे पूजन.

# खंडोबांचा षडरात्रोत्सव उत्सव नव्हे, तर कुळाचार!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मार्गशीर्ष महिना २१ नोव्हेंबरपासून सुरू झाला आहे. त्याचा पहिला दिवस अनेक कारणांनी महत्त्वाचा मानला जातो. त्यात विशेष महत्त्वाचे असते ते खंडोबांचा षडरात्रोत्सव आणि देवदिवाळी. यापैकी देवदिवाळी मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला एक दिवस साजरी केली जाते. का, कशी याची माहिती इतर लेखांत मिळेलच. सदर लेखात आपण खंडोबांच्या षडरात्रोत्सवाची माहिती घेऊ. महाराष्ट्रातील अनेक घरांमध्ये खंडोबांचा षडरात्रोत्सव अर्थात खंडोबांचा सहा दिवसांचा उत्सव कुलधर्म कुलाचार म्हणून केला जातो. मार्गशीर्ष प्रतिपदेला हा उत्सव सुरू होऊन चंपाषष्ठीला तो संपतो. या निमित्ताने कोणता कुलाचार केला जातो ते जाणून घेऊ.

पूर्वी मणी आणि मल्ल या दैत्यांनी लोकांचा खूपच छळ केला. तेव्हा भगवान शंकर यांनी मार्तंड भैरवाचा अवतार घेऊन त्या दैत्यांशी मोठे युद्ध केले. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीला चंपक वनात मणी मल्ल दैत्याचा वध केला. तेव्हापासून ही षष्ठी चंपाषष्ठी म्हणून ओळखली जाते. मणीमल्ल दैत्याचा वध केला म्हणून भगवान शंकर यांना मल्लारी (मल्ल अरी म्हणजे मल्ल नावाच्या दैत्याचा शत्रू) मल्लारी मार्तंड, खंडोबा, खंडेराय असे नाव पडले.

एकार्थाने ही शिवपूजाच आहे. अनेकांच्या घरी ही कुलाचार म्हणून केली जाते. पण तुम्ही शिवपूजा म्हणूनही हा उत्सव पुढीलप्रकारे करू शकता.

### पूजेचा विधी

एका ताम्हनामध्ये किंवा ताटामध्ये श्रीफळ, सुपारी, विड्याची पाने, फळे आणि भंडारा ठेवतात. तेथे नजीकच एका कलशावर श्रीफळ ठेवून त्याची पूजा करतात. खंडोबांना आवाहन करतात. त्या कलशात खंडोबांचे तेज अवतरले असे समजून त्यांची पूजा करतात. नंतर तुपाचे निरांजन लावून ते ताम्हनात ठेवतात व ते ताम्हण कलशाभोवती तीनदा ओवाळतात. मग कलशावरचे श्रीफळ उचलून कपाळाला लावतात. यावेळी सर्व जण ' येळकोट मल्हार- चांगभलं ' असे म्हणत खंडोबांची करुणा भाकतात. खंडोबांना नैवेद्य दाखवून चंपाषष्ठीला अर्थात सहाव्या दिवशी पूजेचे उद्यापन करतात. यंदा २६ नोव्हेंबर रोजी चंपाषष्ठी आहे. खंडोबाची अनेक नावे आणि अनेक रूपे आहेत. काही मुस्लीम बांधव खंडोबांचे भक्त असतात. ते खंडोबांना मल्लुखान म्हणतात. कर्नाटक, आंध्र वगैरे भागात मैलार-मैराळ म्हणजेच खंडोबा हे कुलदैवत आहे. मद्रासची उपनगरी मैलापूर हे मैलारचे मूळ गाव होय.

जेजुरी, निमगाव, पाली पेम्बर, नळदुर्ग, शेंगुड, सातारे, मालेगाव (नांदेड), मैलापूर, मैलारसिंग, देवरगुड्डू, मणमैलार वगैरे खंडोबाची तीर्थक्षेत्रे आहेत. लग्न झालेली नवदाम्पत्ये जेजुरीला किंवा त्यांचे कुलदैवत खंडोबा ज्या गावी असेल त्या गावी जाऊन तळी भरतात, आरती करतात. हा कुलाचार आहे. त्याला आहेर यात्रा असेही म्हणतात.



# खंडोबांच्या गाण्याचा खरा अर्थ

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आगडदुम नगारा सोन्याची जेजुरी या ओळी गाणे बनून सगळेकडे घुमत आहेत. मात्र या ओळी नक्की काय आहेत हे समजून घ्यायला हवे.

जेजुरीला गेल्यावर तळी-भंडार हा आवश्यक विधी त्याचे हे बोल-मंत्र आहेत. दर्शन झाल्यावर कुळाचार म्हणून तळी भरली जाते. एका तबकात किंवा मोठ्या कपड्यात विड्याची पाने, खोबरे, लाह्या, सुपाऱ्या, दक्षिणा, भंडारा इत्यादी घेऊन त्याला विषम संख्येतील पुरुष हाताने उचलून सतत वर खाली करतात ही कृती सदानंदाचा येळकोट म्हणत केली जाते. येळकोट हा कानडी शब्द आहे. कानडीमध्ये येळू म्हणजे सात आणि कोट म्हणजे कोटी, खंडेरायासोबत मणी-मल्लाशी युद्ध करताना सात कोटी सैन्य होते. सदानंद हे खंडेरायाचेच एक नाव. या सात कोटी सैन्यावरून सदानंदाचा येळकोट हा गजर रूढ झाला. हे झाले तळी भंडार.

### खंडोबांविषयी थोडेसे...

खंडोबा हे भगवान परमशिवाचेच स्वरूप होय. त्यांना मार्तंड भैरव असेही म्हटले जाते. खंडोबा हे मूळचे कन्नड प्रांतातले, वीरशैव पंथातील दैवत. कानडीत खंडोबा यांना मैलार किंवा मैलारलिंग संबोधले जाते. यांचे सासर नेवासे. लग्न ठरलेले असताना खंडेरायांनी स्वतःच्या होणाऱ्या पत्नीला पळविले. तिच्याशी गांधर्व-पद्धतीने विवाह केला. पुढे शिकारीला गेल्यावर देव खंडोबा धनगरांच्या वस्तीत आले. तेथे त्यांचे



प्रेम बाणाईशी जडले. तिच्याशी लग्न करून खंडेराय जेजुरीला आले. पण म्हाळसाबाईला हे लग्न मान्य नव्हते. त्यांच्यात भांडण सुरू झाले. खंडोबा त्यांचे भांडण बघून हसू लागतात. या प्रसंगाला अनुसरून बरीच लोकगीते आणि जागरण गीते लिहिली गेली आहेत. पुढे बाणाईची स्वतंत्र व्यवस्था खंडेराय जेजुरगडावर लावून देतात. अधून-मधून भेटीला जातात. खंडोबांची राजधानी म्हणजे आताची जेजुरीनगरी. खंडेरायांना बेल-दवणा आणि भंडारा-खोबरे वाहायची पद्धत आहे. दवणा ही एक सुगंधी वनस्पती आहे. खंडोबांना वाहिलेला बेल-भंडारा हातात घेऊन आण म्हणजे शपथ खायची पद्धत मराठा समाजात रूढ आहे.

खंडोबांनी जेव्हा मणी-मल्लाचा पराभव केला तेव्हा मणी-मल्ल दैत्य खंडोबांना शरण आले. मणीच्या मस्तकावर खंडेरायांचा पाय होता. त्याने विनंती केली, की मला तुझे वाहन होऊ दे आणि मल्लाने विनवणी केली, की तुझ्या नावाआधी माझे नाव लागू दे. त्यामुळे अश्वरूपी मणी खंडोबांचा वाहन झाला. मल्लासुराला खंडोबांनी हरवले म्हणून ते मल्हारी ठरले.

खंडेरायांची मूर्ती जर नीट पहिली तर कालभैरवांच्या मूर्तीशी भयंकर साम्य आढळेल. फक्त शस्त्रांचा क्रम बदलला की दैवत वेगळे ठरते. म्हणजे हे दोन्ही अवतार एकच आहेत. पण कालभैरव हे ब्रह्मचारी दाखविले गेले आहेत. जोतिबांची मूर्ती उभी आहे आणि खंडोबांची मूर्ती बैठी आहे. जोतिबांना गुलाल-खोबरे, तर खंडोबांना भंडार-खोबरे वाहिले जाते. कोकणात रवळनाथ, घाटावर खंडेराय, तर कोल्हापुरात जोतिबा असे आहेत भगवान भोळे शंकर.

खंडोबा हे कडक शिस्तीचे आहेत. एक सेनाप्रमुख म्हणून शिस्तप्रिय असणे रास्तच आहे. खंडोबांची काही स्थाने जागृत मानली गेली आहेत. त्यात मणीचूळ पर्वत म्हणजे आताचे जेजुरी. पाली-पेम्बर, नेवासे-पारनेर आणि मंगसुळी. खंडोबा हे सैन्याचे अधिपती असल्यामुळे युद्धकाळात रात्रीचे जागे राहणे खूप महत्त्वाचे होते. त्यासाठी रणवाद्य वाजवून रात्र जागती ठेवली जायची. त्यातूनच जागरण-गोंधळ या लोककलेचा उगम झाला. सेनापती खंडोबांना त्यामुळेच जागरण अतिशय प्रिय आहे.

लग्न झालेले नवीन जोडपे खंडोबांचा गोंधळ घालतात. त्यांची कृपा प्राप्त करतात. याप्रसंगी कडी-लंगर तोडायची प्रथा आहे. कडी-लंगर म्हणजे एक लोखंडी साखळी असते. ती गोंधळात पूजेच्या ठिकाणी ठेवली जाते. गोंधळ समाप्तीवेळी तोडली जाते. मल्हारी मार्तंडाला बोलीभाषेत खंडोबा म्हणतात. कारण याच्या हातात कायम खंड म्हणजे ख-तलवार आहे. खंड धारण करणारा म्हणून खंडोबा.